नवमहाराष्ट्र युवा अभियान
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**निमंत्रक : मा. सुप्रिया सुळे**
www.navmaharashtra.org

# अभिसरण
Intrastate Youth Exchange Programme 2011

## आवाहन

**मराठी** प्रांत अथवा महाराष्ट्र देशाविषयी बोलायचं झालं तर वेळ आणि जागा दोन्हीही कमी पडतील इतके वैविध्य अन् संपन्नतेने नटलेला हा मुलूख आहे. येथील चांद्यापासून बांद्यापर्यंत प्रत्येक भूभागाचे वेगळेपण आहे. बोलीभाषा, बोलण्याची लकब, पेहराव, खाद्यसंस्कृती, आदरातिथ्य, पारंपरिक शेतीपद्धती, पारंपरिक व्यवसाय व उद्योगधंदे, इथली भौगोलिक अन् सामाजिक परिस्थिती, राजकीय अन् ऐतिहासिक पार्श्वभूमी इथपासून ते अगदी इथल्या निसर्गामध्येही हे वगळेपण जाणवतं. ही भूमी संतांची अन् सुधारकांची, शूरांची अन् वीरांची, कलावंतांची अन् साहित्यिकांची, कष्टकऱ्यांची अन् शेतकऱ्यांची, उद्योजकांची अन् राज्यकर्त्यांची...

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून नवमहाराष्ट्र युवा अभियानाने महाराष्ट्रातील युवांवर लक्ष केंद्रित केलंय आणि सुरू केलाय अनोखा उपक्रम – **अभिसरण** (Intrastate Youth Exchange Program). वैविध्याने नटलेल्या या महाराष्ट्र राज्यातील युवांनी, आपला परिसर सोडून या मराठी मुलुखाच्या कानाकोपऱ्यात जाऊन तेथील माहितीचेच नव्हे, तर तेथील आचार, विचार, भाषा, आवडी-निवडी, सवयी, व्यवहार, संस्कृती यांचे आदान-प्रदान करण्याची ही एक जाणीव प्रक्रिया.

| विभाग | कालावधी |
|---|---|
| मराठवाडा ते मुंबईसह उपनगर | २५ मे ते २ जून २०११ |
| कोकण ते उत्तर महाराष्ट्र | ५ ते १३ जून २०११ |
| विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र | १६ ते २४ जून २०११ |

**...आता या उपक्रमाचे तिसरे पर्व' सुरू होतेय. या आधीच्या दोन पर्वांमध्ये आपल्यासारख्याच अनेक युवांनी सहभाग घेतला आणि या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

**आता तुमची वेळ...!**

# माहितीपत्रक

**मोहिमेचा ठळक बाबी :**

- **मोहिमेचा कालावधी :** हा एकूण ९ दिवसांचा उपक्रम आहे.
- **मोहिमेमध्ये सहभागी विभाग :**

या तिसऱ्या पर्वाकरिता महाराष्ट्राच्या सहाही प्रशासकीय विभागांमध्ये (कोकण, मराठवाडा, विदर्भ, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र आणि मुंबईसह उपनगर) आदान-प्रदान केले जाणार आहे.

| विभाग | कालावधी |
|---|---|
| मराठवाडा ते मुंबईसह उपनगर | २५ मे ते २ जून २०११ |
| कोकण ते उत्तर महाराष्ट्र | ५ ते १३ जून २०११ |
| विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र | १६ ते २४ जून २०११ |

## कोकण ते उत्तर महाराष्ट्र

**मोहिमेमध्ये सहभागी युवा :**

- या मोहिमेकरिता कोकण विभागातील प्रत्येकी ५० युवांची निवड केली जाईल.
- कोकण विभागाच्या सर्व जिल्ह्यांतून युवांचा समावेश केला जाणार आहे.
- मोहिमेकरिता निवड होण्यासाठी अर्ज करावयाचा असून आवश्यक वाटल्यास मुलाखतीही घेण्यात येतील.
- सदर मोहिमेकरिता १८ ते २७ वर्षे वयोगटातील कोणताही युवा अर्ज करू शकतो.

**मोहिमेचे स्वरूप :**

- **दि. ५ जून २०११** (पहिला दिवस), **ठाणे** (मध्यवर्ती ठिकाण) : कोकण विभागातील ठळक बाबी अन् वैशिष्ट्यांविषयी वेगवेगळे खेळ, एक्झरसाइजेस अन् तज्ज्ञ, जाणत्यांच्या माहितीपर व्याख्यानातून विस्तृतपणे ओळख करून दिली जाईल.
- **दि. ६ जून २०११** (दुसरा दिवस), **नाशिक** (मध्यवर्ती ठिकाण) : उत्तर महाराष्ट्र विभागातील ठळक बाबी अन् वैशिष्ट्यांविषयी वेगवेगळे खेळ, एक्झरसाइजेस अन् तज्ज्ञ, जाणत्यांच्या माहितीपर व्याख्यानातून विस्तृतपणे ओळख करून दिली जाईल.
- **दि. ७ ते १२ जून २०११** (तिसरा ते आठवा दिवस), **उत्तर महाराष्ट्र** विभागातील वेगवेगळ्या उपनगरांमधील वेगवेगळ्या भागांमध्ये संमिश्र गटांमध्ये युवा फिरतील.
- **दि. १३ जून २०११** (नववा दिवस), **नाशिक** (मध्यवर्ती ठिकाण) : आलेल्या अनुभवांचे, झालेल्या शिक्षणाचे आणि केलेल्या मौजमजेचे आदान-प्रदान करण्यासाठी प्रदर्शन जत्रा भरवली जाईल. त्याचप्रमाणे सहभागी युवांना प्रमाणपत्र वाटप आणि सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न होतील.

**वैशिष्ट्ये :**

- या संपूर्ण उपक्रमामध्ये करावयाचा प्रवास हा एस.टी. बसनेच करावयाचा आहे.
- या उपक्रमादरम्यान राहण्याची अन् खाण्याची व्यवस्था मुंबई विभागातील स्थानिक कुटुंबांमध्ये केली जाईल.

**महत्त्वाची सूचना :**

- आपण सादर केलेला अर्ज हा केवळ नोंदणी अर्ज असून या अर्जाच्या छाननीनंतर सहभागी युवांची अंतिम निवड केली जाईल.
- सदर मोहिमेसाठी आवश्यक असलेले अर्ज मुंबई कार्यालयात (नवमहाराष्ट्र युवा अभियान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईन्ट, मंत्रालयासमोर, मुंबई-२१) उपलब्ध असून आमच्या संकेत स्थळावरदेखील (www.navmaharashtra.org) उपलब्ध आहे.
- अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. १५ एप्रिल २०११ आहे.
- आपला नोंदणी अर्ज आपण info@navmaharashtra.org या ई-मेलवरही आमच्याकडे पाठवू शकता.
- निवड झालेल्या युवांची अंतिम यादी दि. २५ एप्रिल २०११ पर्यंत जाहीर करण्यात येईल.
- अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर १० दिवसांच्या आत ठरावीक अनामत रक्कम भरणे बंधनकारक राहील. त्यानंतरच आपला सहभाग अंतिम मानला जाईल.
- सहभागी युवांनी सगळा प्रवास खर्च हा स्वतः करावयाचा आहे.
- या मोहिमेकरिता राज्य परिवहन मंडळाचा ७ दिवसांचा एक आणि ४ दिवसांचा असे २ विशेष प्रवासी पास काढावयाचे असून सदर पासेसची किंमत अंदाजे अनुक्रमे रु.९००/- आणि रु.६००/- इतकी आहे.
- हा पास काढण्याकरिता सर्व आवश्यक सूचना आमच्या आयोजक टीमकडून त्या-त्या वेळी दिल्या जातील.
- या उपक्रमादरम्यान राहण्याची अन् खाण्याची व्यवस्था आयोजक टीमतर्फे करण्यात येईल.
- सहभागी युवा गट मुंबई विभागातील मान्यवर व्यक्ती, संस्था, संघटना, शासकीय यंत्रणा, शेती आधारित उद्योग, औद्योगिक संस्था, सामाजिक जीवन, भौगोलिक रचना, ऐतिहासिक वास्तू, स्थानिक खाद्य संस्कृती, परंपरा इ. बाबींचा अभ्यास करतील. सदर अभ्यासाकरिता उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सविस्तरपणे मार्गदर्शन केले जाईल.


**अधिक माहितीसाठी संपर्क :**

**मुख्य समन्वयक :**
सुबोध जाधव (९८२३०६७८७९)
**कोकण विभाग :**
अभिजीत खानविलकर (९४२११८६११५)

नवमहाराष्ट्र युवा अभियान
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
निमंत्रक : मा. सुप्रिया सुळे
www.navmaharashtra.org

अभिसरण
Intrastate Youth Exchange Programme 2011

# कोकण ते उत्तर महाराष्ट्र
## (नोंदणी अर्ज)

रंगीत छायाचित्र + २

१. संपूर्ण नाव :

| आडनाव | नाव | वडिलांचे/पतीचे नाव |
|---|---|---|

In English

| Surname | First Name | Father's/Husband's Name |
|---|---|---|

२. आईचे नाव :

३. निवासस्थान (सध्याचे) :

पिन कोड :

४. निवासस्थान (कायमचे) :

पिन कोड :

५. जन्मतारीख :

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | १९ |

६. सध्याचे वय :

| वर्ष | महिने |
|---|---|
| | |

७. रक्तगट :

८. लिंग (√) :

| स्त्री : | | पुरुष : | | इतर : | |
|---|---|---|---|---|---|

९. संपर्काचे माध्यम : एस.टी.डी. कोड :

| निवासस्थान | कार्यालय | फॅक्स | मोबाइल |
|---|---|---|---|
| | | | |

१०. ई-मेल :

११. वेबसाईट :

१२. **शैक्षणिक पात्रता** :

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | सन | विद्यापीठ/शैक्षणिक संस्था |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

१३. **कार्यालय/व्यवसाय/संघटना/संस्थेचा पत्ता** (हुद्द्यासह)

**पिनकोड**

१४. **आपण अभिसरण मोहिमेत सहभागी होऊ इच्छिता, कारण...**

१५. **या पूर्वी आपण कोणकोणत्या उपक्रमांमध्ये सहभागी झाला होता?**

१६. **या पूर्वी आपण प्रवास केलेली व आवडलेली दोन ठिकाणे व कारण?**

१७. **या उपक्रमाबद्दल आपणास कुठून माहिती मिळाली?**

**ठिकाण :** (अर्जदाराची स्वाक्षरी)

**दिनांक :** / /२०११ **नाव :**